अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ३३० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

कुलदीप जंगम सोलापूर झेडपीचे नवे सीईओ

आव्हाळेंवर पुण्यात मोठी जबाबदारी

सोलापूर : सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांची बदली झाली असून त्यांच्या जागी बुलढाणा झेडपीचे सीईओ कुलदीप जंगम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आव्हाळे यांना पुण्यात मोठी जबाबदारी दिली गेली असून आता त्या तिथे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पहाणार आहेत. राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या काही दिवसांपूर्वी बदल्या झाल्या होत्या. त्यानंतर, आता राज्यातील अनेक आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, सोलापूरच्या जिल्हा परिषद मुख्याधिकारी मनीषा आव्हाळे यांची पुण्यात बदली करण्यात आली आहे. त्यांना बदलीचे पत्र आल्याचे सांगण्यात आले. अभिनव गोयल यांची नियुक्ती हिंगोली जिल्हाधिकारी या पदावर करण्यात आली आहे. त्यामुळे आव्हाळे यांना पुण्यातील स्मार्ट सिटीची मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.

राज्यात लाडक्या बहिणीचे वादळ...

महायुतीचा 'वारू' सुसाट काँग्रेसचा 'जळफळाट'

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेला उदंड प्रतिसाद मिळत असताना तसेच पहिल्या टप्प्यातच भाग्यवंती ठरलेल्या गरीब-मध्यमवर्गीय महिलांच्या खात्यावर पैसे जमा होत असताना या योजनेवर विरोधकांची अजूनही आगपाखड सुरू असल्याचे दिसून येते. या योजनेच्या प्रसारासाठी महायुतीच्या नेत्यांकडून जिल्हास्तरावर भव्य मेळावे भरवले जात आहेत. त्यामुळे महायुतीचा हा झंझावात पाहून महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या पोटात गोळा उठला आहे. या योजनेला स्थगिती देण्याची याचिका काँग्रेसकडून न्यायालयात पुन्हा दाखल करण्यात आली आहे.एकदा न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिलेला असताना काँग्रेसने पुन्हा आगावूपणा करावा का,असा प्रश्न महायुतीकडून विचारला गेला आहे.

या योजनेतील रक्कम पात्र महिलांच्या खात्यावर जमा होवू लागल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे तसेच आगामी विधानसभा निवडणुकींसाठी वातावर निर्मितीसाठी महायुतीच्या नेत्यांकडून वचनपूर्तीचा सोहळा राज्यभर आयोजित केला जात आहे. सोलापुरात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हा सोहळा होम मैदानावर होणार आहे.चाळीस हजार महिलांची बैठक व्यवस्था याठिकाणी करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून त्याची जय्यत तयारी सुरू आहे. शुक्रवारी नागपूरमध्ये भाजपचा मोठा मेळावा भरवण्यात आला आहे. राज्यात आतापर्यंत झालेल्या मेळाव्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे.भाजप नेते तथा देवेंद्र फडणवीस हेच या योजनेच्या प्रसारासाठी मेळाव्याच्या माध्यमातून मैदानात उतरल्याने भाजपचा सर्वत्र झंझावात दिसत आहे.मेळाव्यांना महिलांचा मिळत असलेला प्रतिसाद पाहाता काँग्रेस नेत्यांची झोप उडाल्याचा निष्कर्ष नुकताच समोर आला आहे.

लाडकी बहीण योजनेला सुरुवातीपासूनच काँग्रेसचा विरोध आहे. यापूर्वी राज्याला कर्जात बुडवून बहिणीला पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप काँग्रेसच्या नेत्यांनी केला होता. ही योजना म्हणजे पोलिटिकल स्टटंबाजी आहे, असा आरोप काँग्रेस नेत्या खा.प्रणिती शिंदे यांनी केला होता.

लाडकी बहीण योजनेला स्थगिती देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिका दाखल करणारे अनिल वडपल्लीवार हे माजी मंत्री सुनील केदारांचे कट्टर समर्थक आहेत. यावरून भाजपने काँग्रेसला कोंडीत पकडले आहे. लाडकी बहीण योजनेला विरोध करणारा काँग्रेसचा चेहरा पुन्हा उघड झाला असल्याचे भाजपने ट्विट केले आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत पराभव दिसत असल्याने लाडकी बहीण योजना आणल्याचा आरोपही केला जात आहे. यापूर्वीसुद्धा लाडकी बहीण योजनेसंदर्भात काँग्रेसने कोर्टात धाव घेतली होती. यावरून काँग्रेसला लाडक्या बहिणीला आर्थिक मदत मिळू द्यायची हे सिद्ध होते. काँग्रेसचा बेगडीपणा यातून उघड झाला आहे, असा आरोप प्रदेश भाजपने आपल्या एक्सवरील पोस्टवर केला आहे. महायुती सरकारचा सर्व फोकस सध्या लाडकी बहीण योजनेवर आहे. विभागनिहाय मेळावे घेण्यात येत आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या मेळाव्याला उपस्थित राहत आहेत. नागपूरमध्ये ३१ ऑगस्टला लाडकी बहीण योजनेचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याकरिता सुमारे एक लाख महिलांना कार्यक्रमाला आणल्या जाणार आहे.

यावेळी ज्यांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा झाले अशा काही बहिणींचा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

काँग्रेसचे काय होणार

मुंबईतील एका चार्टर्ड अकौंटटने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.१४ ऑगस्टला सरकारी तिजोरीतून महिलांच्या खात्यावर जाणाऱ्या निधीला स्थगिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली होती. ही योजना म्हणजे करदात्यांच्या पैशाचा अपव्यय असल्याची तक्रार त्यांनी केली होती परंतु त्याचा निकाल २ ऑगस्टला लागला. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी ही याचिका फेटाळून लावली.त्याचवेळी या योजनेवरील संकट दूर झाले. असे असताना काँग्रेसने नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. यदाकदा ही याचिका फेटाळली गेली तर काँग्रेसच्या अडचणी वाढतील, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.काँग्रेस महिलांच्या विरोधात आहे,असा प्रचार भाजपकडून केला जाईल.तेव्हा काँग्रेसचे काय होणार अशी चिंता खुद्द काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांमधून व्यक्त केली जात आहे.

महायुती प्लसमध्ये

ही योजना महायुतीच्या पथ्यावर पडण्याची चिन्हे दिसत आहेत.लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर विशेष करून काँग्रेसची आगामी विधानसभा निवडणुकीसाठी घोडदौड सुरू आहे.या निवडणुकीतही महायुती लोकसभेप्रमाणे भुईसपाट होणार,अशी गर्जना काँग्रेस नेत्यांकडून केली जात आहे.अशातच महायुतीने नवा पत्ता टाकला.नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या तिसऱ्या टर्मचा शपथविधी झाल्यानंतर काही दिवसातच ही योजना आणली गेली.त्याला मिळत असलेला प्रतिसाद पाहून काँग्रेस नेते चक्रावून गेले आहेत.या योजनेमुळे राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.हे चित्र पाहूनच महायुतीच्या नेत्यांनी मेळावे सुरू केले.या साऱ्या पार्श्वभूमीवर काही संस्थांनी सर्व्हे केला.त्यात महायुती प्लसमध्ये आल्याचा या संस्थांचा अनुमान आहे.

'मध्य'वर मुस्लिम समाजाची दावेदारी काँग्रेससाठी डोकेदुखी ठरणार

अनेकजण इच्छुक; वरिष्ठांपुढेही पडला पेच

सोलापूर/प्रतिनिधी

शहरमध्य विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेल्या प्रणिती शिंदे आता खासदार झाल्यामुळे या मतदारसंघातून काँग्रेसकडून विधानसभेवर जाण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. मात्र मुस्लिम समाजाची या मतदारसंघसावरची दावेदारी काँग्रेससाठी डोकेदुखी ठरणार आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघात १० वर्षांनंतर विजय मिळवत काँग्रेसने कमबॅक केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत आत्मविश्वास संचारला आहे. महाविकास आघाडी विशेषतः काँग्रेसच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे. मध्यच्या आमदार प्रणिती शिंदे खासदार झाल्यामुळे यावेळी विधानसभेला रांगेत असलेल्यांचा विचार पक्षश्रेष्ठींना करावा लागणार आहे. लोकसभेला मुस्लिम समाजाने एकगट्ठा काँग्रेसला मतदान केले आहे. त्यामुळे ही जागा मुस्लिम समाजाला सोडण्याची मागणी जोर धरत आहे.

काँग्रेसकडून यात मतदारसंघातून चेतन नरोटे, संजय हेमगड्डी, बाबा करगुळे, देवेंद्र भंडारे यांच्याबरोबरच माजी महापौर आरिफ शेख, फिरदोस पटेल, रियाज हुंडेकरी, बाबा मिस्त्री, जुबेर कुरेशी, शकील मौलवी यांच्यासह अनेकांनी उमेदवारीची मागणी केली आहे.

शहर मध्य मतदारसंघात एक लाखांपेक्षा जास्त मतदान मुस्लिम समाजाचे आहे. त्यामुळे या समाजाने या मतदारसंघावर दावा केला आहे.

काँग्रेसकडून मुस्लिम समाजातील कोणत्याही नेत्याला उमेदवारी द्या, आम्ही त्याला निवडून आणू यावर समाजाचे एकमत होत आहे. त्यामुळे काँग्रेसपुढेही प्रश्न निर्माण झाला आहे. काँग्रेसने जर मुस्लिम समाजाला डावलले तर ही जागा धोक्यात येण्याची शक्यताही मुस्लिम बांधव बोलून दाखवत आहेत.

विजापूर नाका येथे समाजाची बैठक

गुरूवारी विजापूर नाका येथे हारून खान यांच्या घरी मुस्लिम बांधवांची बैठक झाली. याचेळी हा मतदारसंघ कोणत्याही परिस्थितीत मुस्लिम समाजाला सोडवून घ्यायचाच याबाबत चर्चा झाली. या बैठकीत माजी महापौर आरिफ शेख, माजी नगरसेवक रियाज खरादी, शैकत पठाण, रफिक हुंडेकरी, निमाज शेख यांच्यासह पवार गट आणि ठाकरे गटातील मुस्लिम समाजातील नेते उपस्थित होते. यापुढील बैठक १० सप्टेंबर रोजी घेण्याचे ठरले.

एकत्र येत मुस्लिम समाज अपक्ष लढेल : खरादी

लोकसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाने एकत्र येत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला. आता काँग्रेसने याची उतराई करण्याची वेळ आली आहे. काँग्रेसने जर ही जागा मुस्लिम समाजाला नाही सोडली तर मुस्लिम समाज एकत्र येत अपक्ष निवडणूक लढवेल असे माजी नगरसेवक रियाज खरादी यांनी सांगितले.

बार्शी बाजार समितीवर तिघांचे अशासकीय प्रशासक मंडळ

विजय राऊत मुख्य प्रशासक

बार्शी/प्रतिनिधी

बार्शी कृषि उत्पन्न बाजार समितीवर अशासकिय प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले असून आमदार राजेंद्र राऊत यांचे बंधू विजय राऊत यांची मुख्य प्रशासकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत.

बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाचा पंचवार्षिक कालावधी संपल्यानंतर शासनाने या संचालक मंडळास दोन वेळा मुदतवाढ दिली होती. २३ जुलै रोजी सदरची मुदतवाढ संपुष्टात आली. त्यानंतर शासनाने दि २५ जुलै रोजी सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक उमेश पवार यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर त्यानंतर शासनाचे अपर सचिवांच्या पत्राच्या अनुषंगाने निवडणूक होईपर्यंत विजय राऊत यांची मुख्य प्रशासक म्हणून, तर शाहूराजे निंबाळकर यांची व ओंकार धायगुडे यांची अशासकीय प्रशासक मंडळाचे सदस्य म्हणून नेमणूक करण्याबाबत आदेश निर्गमित करण्याबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी अशासकीय प्रशासक मंडळ नियुक्त करत असल्याचे म्हटले आहे. गुरूवारी विजय राऊत यांनी मुख्य प्रशासक म्हणून पदभार घेतला. यावेळी विजय राऊत, निंबाळकर व ओंकार धायगुडे यांचा बाजार समितीतील मर्चंट असोसिएशनच्यावतीने अध्यक्ष बाबासाहेब कथले यांनी सत्कार केला. यावेळी आमदार राजेंद्र राऊतही उपस्थित होते.

बार्शी : निवडीनंतर विजय राऊत, निंबाळकर यांचा मर्चंट असोसिएशनच्यावतीने सत्कार करण्यात आला. सोबत आ. राऊत.

१७ रोड रोमीओवर कारवाई

सोलापूर : पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर अंतर्गत दामिनी पथकामार्फत शाळा, कॉलेज, बाजारपेठ, गर्दीच्या ठिकाणी गस्त घालुन महिला व मुलींची छेडछाड करणाऱ्या १७ रोड रोमिर्योवर दामिनी पथकामार्फत ११/११७ प्रमाणे कारवाई करण्यात आली. त्यांना समज देवून सोडण्यात आले. तसेच किल्ला बगीचा मधील सार्वजनिक ठिकाणी अश्लिल चाळे करणाऱ्या जोडप्यांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच सोलापूर शहर हद्दीमधील शाळा व कॉलेजना भेट देवून तेथील विद्यार्थीनींना छेडछाडीचा प्रकार घडुन आल्यास दामिनी पथकाशी संपर्क साधवा, अशा सूचना दिल्या.

मालट्रकखाली चिरडून दोन सख्ख्या बहिणी ठार

सोलापूर : भरधाव वेगाने येणाऱ्या मालट्रकची धडक बसून दोन सख्ख्या बहिणी ठार झाल्याची घटना गुरुवारी दुपारी हैदराबाद रोडवरील चंदन काट्याजवळ घडली. ज्योती यशवंत बडगंची (वय ५०, रा. दत्तनगर, सोलापूर) व जयंती कमलाकर उदगिरी (वय ५३, रा. सैफुल, सोलापूर) अशी या महिलांची नावे आहेत. या दोन्ही सख्ख्या बहिणी होत्या. काही कारणानिमित्त त्या हैदराबाद रोड विडी घरकुलला दुचाकी वाहनावरून (एमएच १३ बीटी ४३३५) गेल्या होत्या. काम आटोपल्यानंतर त्या दुपारी ३ वाजता विडी घरकुलमार्गे हैदराबाद रोड महामार्गावरून बोरामणी चौकाकडे निघाल्या होत्या. चंदन काट्याजवळ ते आले असता समोरून येण्या भरधाव ट्रकची (एमएच १० झेड २६३९) त्यांना जोरदार धडक बसली. या धडकेनंतर त्या वाहनाखाली चिडून गंभीर जखमी झाल्या. जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल केले. जखमीपैकी ज्योती यशवंत बडगंची या उपचारापूर्वीच मयत झाल्या. दुसऱ्या जखमी जयंती कमलाकर उदगिरी यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. सायंकाळी सहाच्या सुमारास त्या मरण पावल्या. या घटनेनंतर ट्रकचालक हा फरार झाला आहे. याप्रकरणी जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सायंकाळी सुरू होती.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

सध्या तुमचे ग्रह अनुकूल नाहीत..!

कल्याण
560-12-147

मुंबई
690-59-199

भाविकांसाठी गूड न्यूज

विठ्ठलाच्या पूजाविधीची घरबसल्या बुकिंग सोय

पंढरपूर/प्रतिनिधी

विठ्ठल भक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यापूजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा अशा सर्व पूजाचे बुकिंग आता घरबसल्या भाविकांना करता येणार आहे. त्यामुळे भाविकांना आता पंढरपूर मंदिरात येण्याची आवश्यकता असणार नाही असे मंदिर समितीकडून सांगण्यात आले. समितीकडून ही संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे.

विठ्ठल मंदिरात देवाच्या विविध पूजांना खूप मोठी मागणी असते. या पूजा मिळवण्यासाठी भाविकांना खूप प्रयत करावे लागतात. मात्र, या पूजा बुकिंगम ध्ये गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी गेल्या अनेक दिवसांपासून येत असल्याने गरजू भाविकांना इच्छा असूनही या पूजा करता येत नव्हत्या. देवाच्या पूजेतील सुसूत्रता आणण्यासाठी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम हाती घेतले होते आता हे काम पूर्ण झाल्याने देवाच्या कोणत्याही पूजा भाविकांना घरबसल्या ऑनलाईन बुकिंग करता येऊ शकणार आहेत. यामुळे या पूजेतील कथित गैरव्यवहाराला पूर्णपणे आळा बसणार आहे.

लवकरच ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू : देवाच्या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून लवकरच ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. याबाबत मंदिर समितीच्या बैठकीत या संदर्भात निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून, भाविकांना पूजेची नोंदणी https:www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. तरी राज्यभरातील भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे.

विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या पूजांचे १ ऑक्टोबरपासून भाविकांना बुकिंग करता येणार आहे. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समतीच्या वतीने याबाबतची संगणक प्रणाली विकसित झाली असून, याबाबत चाचणी घेण्याचे काम सुरू आहे. येत्याा पंधरा दिवसांत काम पूर्ण होऊन १ ऑक्टोबरपासून बुकिंग सुरू करण्यात येणार आहे. त्याामुळे भाविकांना घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने पूजा नोंद करता येईल असे मंदिराचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले आहे.

पार्लर दुकानदाराची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : एका ३६ वर्षीय मेन्स पार्लरच्या चालकाने स्वतःच्या दुकानातच गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मित्रनगर शांतीनगर रोड, मजरेवाडी) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली. सिद्राम मोहन कंकनाळ (वय ३६ रा.मित्रनगर मजरेवाडी शांतीनगर रोड) असे गळफास घेतलेल्या दुकानदाराचे नाव आहे. त्याचे घराशेजारी आयडियल मेन्स पार्लर नावाचे दुकान आहे. बुधवारी सायंकाळी तो घरात जेवण करून दुकानात गेला होता. बराच वेळ झाला तरी तो आला नाही म्हणून, पत्नी दुकानात गेली त्यावेळी त्याचा मृतदेह छताच्या लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत सिद्राम याच्या पश्चात पत्नी दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार कटके पुढील तपास करीत आहेत.